# श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची.

प्रत्येक वर्षी श्री ज्ञानेश्वर महाराज मंदीरात होणारे धार्मिक कार्यक्रम

चैत्र शुद्ध ।।१।। **''गुढीपाडवा''**

स्कीम प्रमाणे श्रींना नवीन पोशाख होतो. ग्रामजोशी मंदीरात येउन व्यवस्थापकांचे हस्ते पंचांग पूजा. गुढी पूजन श्रींना गाठी अर्पण श्रींची पवमान पूजा मा. प्रमुख विश्वस्तांच्या हस्ते. श्री गणेश अवतार उटी द्वारे केला जातो, खीर पुरीचा नैवेद्य. सायंकाळी ४ ते ६ कीर्तन. श्रींना चंदन उटी लावण्याचा प्रारंभ होतो उटीचा कार्यक्रम ७ जून पर्यंत. दररोज १.५० किलो चंदन उटी. पंचांग पूजा सकाळी ७ ते ८, प्रवचन ८ ते ९ साधकाश्रम. (रोज दुपारी श्रींच्या समाधीस चंदनाचा लेप दिला जातो - संस्थान व भाविकांतर्फेही. रोज पंचपक्वान्नाचा नैवेद्य होतो.)

चैत्र शुद्ध ।।९।। **''श्री राम नवमी''**

श्रींची पूजा. गुढी उभारली जाते. श्रींना नवीन पोषाख. सकाळी १० ते १२ रामजन्माचे श्री. माझे मानकरी यांचेतर्फे कीर्तन. रामजन्माचा पाळणा गायला जातो. त्यानंतर सर्व परिवार देवतांची आरती व श्रींची आरती होते व मानकऱ्यांना श्रीफल दिला जाते. सुंठवडा प्रसाद दिला जातो. दुपारी २ ते ५:३० श्रींना शिंदेशाही अवतार चंदनउटी होते. त्यानंतर वसंतपूजा होते, ब्राम्हण, सेवक व ग्रामस्थ यांना गुडदाणी, कलिंगड, कैरीचे पन्हे व दक्षिणा दिली जाते. सायंकाळी ६ वाजता श्रीरामाची पालखी मंदीरात येते. मंदीरात व्यवस्थापकांच्या हस्ते पालखीचे स्वागत केले जाते. श्रीरामाची पूजा करुन श्रीरामाला शाल अर्पण केली जाते. गुडदाणीचा नैवेद्य दाखविला जातो. त्यानंतर रात्री श्री. मोझे मानकरी यांचेतर्फे जागर होतो. उपवासाचा नैवेद्य होतो.

चैत्र शुद्ध ।।१४।।

श्रीचें धुपारती वेळी रात्री काळा मारुती येथे धुपारती होते.

चैत्र शुद्ध पौर्णिमा **''हनुमान जयंती''**

पहाटे ४ वाजता अजानबाग जवळील मारुतीला रुद्राभिषेक केला जातो. मंदिरात जन्माचे पहाटे ५।। ते ७ व ५ ते ७ काळामारुती पुढे कीर्तन श्री मोझे यांचे तर्फे होते, त्यानंतर वाजतगाजत दिंडीसह गावातील काळा मारुती, शनी मारुती व हजेरीमारुतीला जातात तेथे आरत्या होतात.त्यानंतर माउलींची आरती होते व सुंठवडा प्रसाद दिला जातो. श्री मारुतीला दहिभाताचा नैवेद्य पहाटे मानकरी कीर्तनकार व मानकरी यांना नारळ प्रसाद दिला जातो. दुपारी १ वाजता मानक-यांना महाप्रसाद दिला जातो.

वैशाख शुद्ध।।३।। **''चैत्र गौरीचे हळदी कुंकू''**

या दिवशी निरनिराळया प्रकारचे फराळाचे पदार्थ करतात. सायंकाळी जवळजवळ स्थानिक व इतर २००० स्त्रियांना हळदी कुंकू व ओटी भरण्याचा कार्यक्रम होतो. यावेळी ओल्या हरभऱ्याची ओटी कैरीची डाळ व कैरीचे पन्हे असते, हा कार्यक्रम मंदीरातील कारंजा मंडपात होतो. देवीचीमुर्ती ठेवून आरास व लाईटींग केली जाते. हयास चैत्री हळदी-कुंकू असे म्हणतात.

वैशाख शुद्ध।।१४।। **''नरसिंह जयंती''**

श्रींना चंदन उटीचा नरसिंह जयंती निमित्त अवतार होतो. सायंकाळी ५ ते ७ कीर्तन वीणा मंडपात होते. त्यानंतर नरसिंह जन्म सोहळा व आरती. प्रसाद म्हणून सुंठवडा दिला जातो व मानकऱ्यांना नारळ प्रसाद दिला जातो.

ज्येष्ठ शुद्ध।। १०।।, ।। ११।।, ।। १२।।

दशहरा निमित्त दशमी, एकादशी व व्दादशी नरसिंह सरस्वती महाराजांचे संस्थान तर्फे भजन मुक्ताबाई मंडप सायं. ५ ते ७ होते.

ज्येष्ठ वद्य।।१।। **''पालखी सोहळा''**

ज्येष्ठ वद्य ।। १।। ते ज्येष्ठ वद्य ।। ८।। (अष्टमी) पर्यंत संस्थानतर्फे पालखी सोहळया निमित्ताने गाथाभजन, प्रवचन व कीर्तन असे कार्यक्रम स्कीमप्रमाणे होतात.

ज्येष्ठ वद्य।।७।। **''आषाढी वारी''**

श्रींचे अश्व अंकलीहून प्रस्थानसाठी येतात. अश्वांचे स्वागत वाजतगाजत केले जाते. देउळवाडयात पायघडया घालून अश्वांची मंदिर प्रदक्षिणा कारंजा मंडपाजवळ आणले जातात. मा. प्रमुख विश्वस्तांच्या हस्ते पूजा केली जाते व नारळ प्रसाद दिला जातो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी ४ वाजता पालखीचे प्रस्थान होते.

ज्येष्ठ वद्य।।८।। **''आषाढी वारी''**

पहाटे ३ वाजता श्रींची पूजा दुपारी १२ वाजता पुरणपोळीचा नैवेद्य. दुपारी ३ वाजता श्रींना नवा पोषाख केला जातो. चोपदार सर्व दिंडीवाल्यांना आमंत्रण १.३० वा. देतात. त्यानंतर दिंडया त्यांना दिलेल्या नंबर प्रमाणे उभ्या राहतात. त्यानंतर हैबतबाबांची आरती होते, यानंतर संस्थानतर्फे सुध्दा आरती होते. प्रतिष्ठीत ५ मानकऱ्यांना मानाचे श्रीफळ दिले जाते. नंतर मा. प्रमुख विश्वस्त माउलींच्या पादुका वीणा मंडपात घेउन येतात व पादुकांची पालखीमध्ये स्थापना केली जाते. त्यानंतर मानकऱ्यांना संस्थानतर्फे पागोटे बांधले जातात. हैबतबाबांच्या वंशजांतर्फे श्रीफळ दिले जातात. संस्थानचे श्रीफळ समाधीजवळ दिले जातात. नंतर पालखी मंदीर व नगरप्रदक्षिणा करुन आजोळ घरी (गांधीवाडा) येथे जाते तिथे माउलींची सार्वजनिक आरती (समाज आरती) होते.

ज्येष्ठ वद्य ।।९।। **''वारी''**

पहाटे ५ वाजता श्रींची पूजा व आरती झाल्यानंतर पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होते. पालखी प्रस्थानानंतर मंदीरातील वीणा मंडपात दररोज ह.भ.प.श्री चक्रांकित महाराज यांचे सायंकाळी ६ ते ८ हरिपाठावर कीर्तन होते. कीर्तन सोहळा श्रावण शुद्ध।।१।। पर्यंत जवळजवळ एक महिना चालते.

आषाढ शुद्ध।।११।।

श्रींना ११ ब्राम्हणांकडून पहाटे रुद्राभिषेक होतो. सायं. ५ वा. श्रींचा मुखवटा पालखीसह नगरप्रदक्षिणा होते.

आषाढ पौर्णिमा

गुरुपौर्णिमेचे दिवशी वीणा मंडपात व्यास पूजा (गुरुपूजन) व संन्याशाची पूजा केली जाते. दुपारी १ वाजता ब्राम्हण, मानकरी व संस्थानचे सेवक यांना भोजन प्रसाद दिला जातो.

आषाढ वद्य।।१०।।

पालखी पंढरपूरावरुन परत येते वेशीपाशी दहिभाताचा नैवेद्य दाखवून ग्रामस्थांतर्फे पालखीचे स्वागत केले जाते. त्यानंतर माउलींचे नगरात आगमन होते, विष्णू मंदीर, राम मंदीर व हरिहरेंद्र स्वामीमठ येथे पालखी पादुका पूजा केली जाते. पूजेनंतर पालखी मंदीरात प्रवेश करुन मंदीर प्रदक्षिणा केली जाते. माउलींची आरती झाल्यानंतर संस्थानतर्फे दिंडीवाल्यांना मानाचे श्रीफळ, गांधी घराण्यातर्फे पुरणपोळीचा नैवेद्य व श्री चक्रांकित महाराज यांचे तर्फे पिठलं-भाकरीचा प्रसाद दिला जातो.

आषाढ वद्य।।११।।

श्रींची मंदिरातून दुपारी १२ वाजता पालखी नगर प्रदक्षिणेस निघते. हजेरी मारुती मंदीरात दिंडीवाल्यांच्या हजे-या अभंग होतात. श्रीफळ व केळी प्रसाद म्हणून दिला जातो. नारळचा खर्च मा. माजी विश्वस्त श्री नंदलाल हिरालाल नाईक हे करतात. हा कार्यक्रम सायं. ५:३० वाजेपर्यंत चालतो. हया कार्यक्रमानंतर ३०० दिंडयांची हजेरी घेतली जाते. हया सर्व कार्यक्रमानंतर पालखी मंदीरात प्रवेश करते. मंदीरात मानकऱ्यांचा श्रीफळ देउन सत्कार केला जातो आणि इथे पालखी सोहळा संपतो.

श्रावण शुद्ध।।१।।

ह.भ.प.श्री चक्रांकित महाराजांचे पालखी सोहळयानंतर काल्याचे कीर्तनाने सांगता होते.

श्रावण शुद्ध।।५।। **''नागपंचमी''**

पंचक्रोशितील स्त्रिया मंदीरात येउन चांदीच्या नागाची पूजा करतात. सकाळी १० वाजता नागाची मिरवणूक निघते. मानकरी-कुऱ्हाडे पाटील व चिताळकर पाटील व घुंडरे घराण्याचा मानाची पूजा होते. मिरवणूकी पुढे सनई चौघडा असतो. मिरवणूक नगरपालिका चौकात येउन पुढे ती विष्णूमंदीर व राममंदीर येथे येते, त्याठिकाणी नागपूजा होउन मानकऱ्यांचा श्रीफळ प्रसाद म्हणून दिला जातो. मिरवणूक मंदीरात आल्यानंतर मानकऱ्यांचा सत्कार होतो. श्री कुऱ्हाडे पाटील, श्री साहेबराव घुंडरे पाटील व चिताळकर पाटील यांना संस्थानतर्फे श्रीफळ दिला जातो. सायंकाळी ४ ते ८ महिलांचा कार्यक्रम होतो.

श्रावण शुद्ध पौर्णिमा **''नारळी पौर्णिमा''**

नारळी पौर्णिमा निमित्ताने श्रींना नारळी भाताचा नैवेद्य दाखविला जातो.

श्रावण वद्य।।१।। **गोकुळ आष्टमी (श्री ज्ञानेश्वर महाराज जन्माष्टमी)**

संस्थानतर्फे नामसप्ताह सुरु होतो. या कार्यक्रमासाठी पंढरपूरावरुन महिनामहा ६० वारकरी संस्थानच्या खर्चाने आणले जातात. या वारकऱ्यांना सकाळची न्याहरी, चहा व दुपारी मिष्ठान्नाचे भोजन दिले जाते. सप्ताहाची सुरुवात माननीय प्रमुख विश्वस्त यांचे हस्ते गाथा पूजनाने होते. कार्यक्रम पुढील प्रमाणे.

**१)** सकाळी ९ ते १ गाथा भजन, **२)** दुपारी ४ ते ५ प्रवचन, **३)** सायं. ६:३० ते ८:३० कीर्तन **४)** रात्री ९ ते १२ गावकरी भजन नंतर ग्रामस्थ व भाविकांकडून खिरापद प्रसाद वाटप होते हे दैनंदिन कार्यक्रम अष्टमी पर्यंत चालतात.

श्रावण वद्य।। ८।।

यादिवशी माउलींना ११ ब्राम्हणांकडून रुद्राभिषेक होतो. पवमान पूजा व दूधारती दररोज चालू असते. गाथाभजनाची समाप्ती गाथापूजनाने मा. प्रमुख विश्वस्त यांच्या हस्ते होते. रात्री १० ते १२ ह.भ.प.श्री विठ्ठल मोझे यांचे तर्फे जन्माचे कीर्तन पंखा मंडपामध्ये होते. त्याचवेळी वीणा मंडपामध्ये गावकरी भजन चालू असते यावेळी वीणा मंडपात दोन विणे असतात एक वीणा पहा-याचा व भजनाचा वीणा हैबतबाबा यांचा असतो. श्रींना नवीन पोशाख केल्यानंतर रात्री १२ वाजता मा. प्रमुख

विश्वस्तांच्या हस्ते गोकुळ पूजा व आरती होते. त्यानंतर मानकऱ्यांचा श्रीफळ, सुंठवडा प्रसाद म्हणून दिला जातो व कार्यक्रम संपतो.

श्रावण वद्य ।। ९ ।। **"गोपाळकाला"**

काल्याचे कीर्तन सकाळी ९ ते ११ झाल्यानंतर एक हजार लोकांना पक्वानाचे भोजन दिले जाते. हा कार्यक्रम नवमी पर्यंत चालतो.

श्रावण वद्य ।।१४ ।। **(पिठोरी) "दीप अमवस्या"**

श्रींना कणीक व बाजरीच्या पिठ यांच्या पणत्या करुन नैवेद्य दाखविला जातो.

भाद्रपद शुद्ध ।।४ ।। **"गणपती उत्सव"**

श्री गणेशास ११ ब्राम्हणांकडून अभिषेक व मोदकाचा नैवेद्य केला जातो. ११ ब्राम्हणांना भोजन व १० दिवस दररोज श्री गणेश मंडपामध्ये वारकरी शिक्षण संस्था, आळंदीतर्फे प्रवचन, कीर्तन व प्रसाद वाटप होतो. यावेळी वा.शि.संस्थेला १ दिवसाचा प्रसादासाठी शिदा दिला जातो. पहिल्या दिवशी गावकरी भजन होते.

भाद्रपद शुद्ध ।।१४ ।। **"अनंत चतुर्दशी"**

मा. व्यवस्थापकांच्या हस्ते सत्यविनायक पूजा होते. १२१ खव्याचे मोदकाचा नैवेद्य होतो. प्रवचनकार, कीर्तनकार, भजनीमंडळ, मानकरी व सेवकांना महाप्रसाद दिला जातो. अनंत चर्तुदशीला अनंताची विधीवत पूजा होते - सत्यनारायणाच्या पूजे सारखी.

भाद्रपद अमावस्या

सर्व पित्री अमावस्या बैलपोळा बैलांची पूजा. ग्रामस्थांच्या मंदिरात येणा-या बैलांना बुक्का लावला जातो.

अश्विन शुद्ध ।।१।। **"घटस्थापना"**

श्री मुक्ताई देवीस नंदादिप व अभिषेक, संस्थानतर्फे सप्तशतीचा पाठ होतो. सदर पाठ (दसरा) विजयादशमी पर्यंत चालतो.

अश्विन शुद्ध ।। ५ ।। (पाचवी माळ) किंवा ।। ७ ।। (सातवीमाळ)

दुपारी १२ वाजता माउलींची पालखी पद्मावती देवीस जाते. देवीस अभिषेक व नैवेद्य होतो. पालखीवाल्यांना वनभोजन- भाजणीचे थालपीठ, मुगाची खिचडी, पोळी, मटकीची उसळ, दही व उपवासाची खिचडी केली जाते. दुपारी ४ वाजता पालखी श्री चांगदेव महाराज भेटीस विश्रांतवड येथे जाते. सायं. ६ ते ७ श्री बळीबा भोसले यांचे वस्तीवर विश्रांती. तेथून सायं. ७ वाजता मंदीराकडे प्रस्थान होते. मंदीरात आरती नंतर मानकऱ्यांचा श्रीफळ दिले जाते.

अश्विन शुद्ध ।।१०।। **"दसरा"**

पहाटे ३ वा. घंटानाद, पहाटे ३.१५ वा. काकडा व पवमान अभिषेक पहाटे ३.३० वाजता मा. प्रमुख विश्वस्तांच्या हस्ते श्रींची पूजा. श्रींना पोषाख. सकाळी ९ वाजता व्यवस्थापकांच्या हस्ते शमीपूजन. सायं. ५ वा. श्रींची पालखी (मुखवटा) सीमोल्लंघनासाठी मंदीरातून प्रस्थान करते. सायंकाळी ७ वा. खंडोबाच्या माळावर व्यवस्थापकांच्या हस्ते आपटयांच्या पानांची पूजा होते. त्यानंतर पालखी मंदीराकडे प्रस्थान करते. मंदीरात मानकऱ्यांना श्रीफळ दिले जाते.

अश्विन शुद्ध ।।१४।। **"कोजागिरी पौर्णिमा"**

रात्री १० ते १२ गावकरी भजन कारंजा मंडपात. केशरी दूधाची विधीवतपूजा व नैवेद्य. सर्व उपस्थित भाविकांना केशरी दूध दिले जाते. दुधामध्ये चंद्राची प्रतिमा पडते. सदर पूजा कार्यालयाचे समोर प्रांगणात होते. मानकऱ्यांना श्रीफळ दिले जाते.

अश्विन वद्य ।।१२।। **''वसुबारस''**
गोमातेची पूजा.

आश्विन वद्य ।।१३।। **''धनत्रयोदशी''**
(धने व गुळाची पूजा.) सदर पूजा आपण दिवाळी पाडव्या दिवशी करतो.

आश्विन वद्य ।।१४।। **''नरकचतुर्दशी ''**
श्रींना मा. विश्वस्तांच्या हस्ते अभ्यंगस्नान व औक्षण. फराळाचा नैवेद्य. दुपारी १२ वाजता पंचपक्वांनाचा नैवेद्य.

आश्विन ।।३०।। **''लक्ष्मी पूजन''**
श्रींना मा. विश्वस्तांच्या हस्ते अभ्यंगस्नान व औक्षण. फराळाचा नैवेद्य. दुपारी १२ वाजता पंचपक्वांनाचा नैवेद्य.

कार्तिक शुद्ध ।।१।। **''बलि प्रतिपदा''**
श्रींना व पहाटे ३.३० पवमान अभिषेक व दुधाचा मा. प्रमुख विश्वस्तांच्या हस्ते अभ्यंगस्नान व औक्षण, फराळाचा नैवेद्य. सकाळी ९ वाजता मा. प्रमुख विश्वस्तांच्या हस्ते वहिपूजन. श्रींना नवीन पोषाख. दुपारी १२ वाजता पंचपक्वानाचा नैवेद्य.

कार्तिक शुद्ध ।।२।। **''भाऊबीज''**
श्रींना अभ्यंगस्नान व औक्षण, फराळाचा नैवेद्य, पक्वानाचा नैवेद्य. मा. विश्वस्तांच्या हस्ते पूजा.

कार्तिक शुद्ध ।।११।।
पालखीची नगरप्रदक्षिणा.

कार्तिक शुद्ध ।।१२।। **''तुळशी विवाह''**
व्यवस्थापकांच्या हस्ते तुळशी विवाह धुपारती झालेनंतर करुन प्रसाद वाटप होतो. (का.शु.।। १२।। रोजी गुरुवार आल्यास अगोदर तुळशी विवाह होतो.)

कार्तिक पौर्णिमा **''त्रिपुरारी पौर्णिमा''**
श्री सिद्धेश्वर मंदीराच्या बाहेरील बाजूस वाती लावल्या जातात.

कार्तिक वद्य ।।१।। **''संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा.''**
देवस्थानच्या वतीने कार्तिक वद्य ।। १।। पासून कार्तिक वद्य ।।५।। पर्यंत नामसप्ताह सोहळा केला जातो. सकाळी गाथा भजन, सायं. ६:३० ते ८:३० पर्यंत कीर्तन.

कार्तिक वद्य ।।६।।
स्कीम प्रमाणे (परंपरेप्रमाणे) मानाची कीर्तने कार्तिक वद्य अमावस्ये पर्यंत.

कार्तिक वद्य ।।८।। **कार्तिक यात्रा आरंभ**
सकाळी ८ वाजता मा. प्रमुख विश्वस्तांचे उपस्थितीत श्रीगुरु हैबतरावबाबा पायरी पूजा हैबतबाबांचे वंशजांचे हस्ते. दुपारी १ ते ३ वा. पर्यंत हैबतरावबाबांचे पुण्यतिथी

निमित्त भोजन प्रसाद. संस्थानचे वतीने वासकर फडावर ह.भ.प.मल्लपा महाराज वासकर यांचे हस्ते व मा. प्रमुख विश्वस्तांचे उपस्थितित कार्तिकी यात्रेला आरंभ मंदीर २४ तास भाविकांच्या दर्शनासाठी खुले असते. श्री नामदेव महाराज पालखी, श्री गजानन महाराज पालखी, श्री संत चोखोबा महाराज पालखी इत्यादींचे आळंदीत आगमन होते. अष्टमी व नवमीला या सर्व पालख्या मंदीराला प्रदक्षिणा घालतात आणि याच वेळी सर्व दिंडयांचे आळंदीत आगमन होते.

कार्तिक वद्य ।।९।।

सकाळी ९ ते ११ काल्याचे कीर्तन, सर्व कीर्तने स्कीम प्रमाणे होतात.

कार्तिक वद्य ।।१०।। खालील प्रमाणे कार्तिक यात्रा कार्यक्रम

| वेळ | कार्यक्रम | कोणातर्फे |
|---|---|---|
| | **कार्तिक वद्य अष्टमी** | संस्थानतर्फे |
| पहाटे ३ ते ५ | काकडा व जागर आरती व महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ५ ते दु. ११:३० | भाविकांच्या महापूजा | |
| सकाळी ७ ते ९ | महाद्वारात वै. हैबतरावबाबांच्या पायरीची महापूजा | |
| सकाळी ९ ते ११ | सप्ताहाचे काल्याचे कीर्तन | संस्थानतर्फे |
| दुपारी १२:३० ते १ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| संध्या ५ ते ६:३० | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. योगीराजबुवा ठाकूर |
| संध्या ६:३० ते ८.३० | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. बाबासाहेब आजरेकर |
| रात्रौ ९ | श्री पुंडलिक महाराज व श्री नामदेव महाराजांचे पालख्यांचे आगमन व समाधीमंदिरात प्रदक्षिणा | |
| रात्रौ ९ ते ९-३० | धुपारती | संस्थानतर्फे |
| रात्रौ १२ ते ३ | जागर हैबतरावबाबा पायरीपुढे | ह. भ. प. वासकर महाराज |
| रात्रौ ३ ते ५ | जागर हैबतरावबाबा पायरीपुढे | ह. भ. प. मारुतीबुवा कराडकर |
| पहाटे ५ ते ६ | जागर हैबतरावबाबा पायरीपुढे | ह. भ. प. हैबतराव प्रतिनिधीतर्फे |

## कार्तिक वद्य नवमी

| | | |
|---|---|---|
| पहाटे ३ ते ५ | काकड व जागर आरती व महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ५ ते दु. ११:३० | भाविकांच्या महापूजा | |
| दुपारी १२:३० ते१ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| रात्रौ ५ ते७ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. बाबासाहेब देहूकर |
| रात्रौ ७ ते९ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. वासकर महाराज |
| रात्रौ ९ ते ९-३० | धुपारती | संस्थानतर्फे |

## कार्तिक वद्य दशमी

| | | |
|---|---|---|
| पहाटे ३ ते ५ | आरती, महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ५ ते दु. ११.३० | भाविकांच्या महापूजा | |
| दुपारी १२.३० ते१ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| संध्या ४ ते ६ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. गंगुकाका शिरवळकर |
| संध्या ४ | हैबतरावबाबांची दिंडी समाधीमंदिर प्रदक्षिणा करुन नगरप्रदक्षिणेस निघेल. | |
| संध्या ६ ते८ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. धोंडोपंतदादा अत्रे |
| रात्रौ ८ | हैबतरावबाबांची दिंडी नगरप्रदक्षिणा करुन महाद्वारातून आत येते. | |
| रात्रौ ८-३०ते९ | धुपारती | संस्थानतर्फे |

| | | |
|---|---|---|
| रात्रौ १० ते ११:३० | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. वासकर महाराज |
| रात्रौ ११:३० ते १२:३० | जागर वीणामंडपात | ह. भ. प. वाल्हेकर महाराज |
| | **कार्तिक वद्य एकादशी** | |
| रात्रौ १२:३० ते प. ३ | जागरआरती, मंदिरसफाई, महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| छुपारी १२ ते१ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| दुपारी १ | श्रींची पालखी समाधीमंदिरातून (मुखवटा) नगरप्रदक्षिणेसाठी महाद्वारातून बाहेर जाते. | |
| दुपारी २ ते ६ | दुपारची पासाची दर्शनबारी | संस्थानतर्फे |
| सायं ५ ते ६.३० | कीर्तन वीणामंडपात | संस्थानतर्फे |
| सायं ६.३० ते ८ | कीर्तन वीणामंडपात | संस्थानतर्फे |
| रात्रौ ८ | श्रींची पालखी नगरप्रदक्षिणा करुन महाद्वारातून मंदिरात येते. | |
| रात्रौ १२ ते ३ | जागर वीणामंडपात | ह. भ. प. मोझे महाराज |
| | **कार्तिक वद्य द्वादशी** | |
| पहाटे ३ ते ४:३० | जागरआरती, महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ४:३० ते ५ | महापूजा मे. प्रांतसाहेब यांची | |
| पहाटे ५ ते दु. ११:३० | भाविकांच्या महापूजा | |
| दुपारी १२:३० ते१ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| दुपारी ४ ते ८ | रथोत्सव, श्रींची पालखी नगरप्रदक्षिणेसाठी महाद्वारातून जाते. (मुखवटा) | |
| दुपारी ४ ते ६ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. हरिभाउ बडवे |
| रात्रौ ८ | श्रींची पालखी नगरप्रदक्षिणा करुन महाद्वारातून मंदिरात येते.(मुखवटा) | |
| रात्रौ ८:३० ते ९:३० | धुपारती | संस्थानतर्फे |

| | | |
|---|---|---|
| रात्रौ १०ते१२ | कीर्तन वीणामंडपात | ह. भ. प. केंदूरकर महाराज |
| रात्रौ ११ते१ | खिरापत पूजा व प्रसाद वाटप (वीणामंडपात) नारळप्रसाद वाटप श्रींचा गाभारा | संस्थानतर्फे |
| | **कार्तिक वद्य त्रयोदशी** | |
| पहाटे ३ते ४:३० | महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ४:३० ते ११:३० | भाविकांच्या महापूजा व नामदेव महाराजांची महापूजा | |
| सकाळी ७ ते ९ | काल्याचे कीर्तन वीणामंडपात | संस्थानतर्फे |
| सकाळी १० ते १२ | समाधी सोहळयाचे कीर्तन वीणामंडपात | ह.भ.प. नामदास महाराज |
| दुपारी १० ते १२ | महाद्वार काल्याचे कीर्तन व कीर्तनानंतर हैबतरावबाबांची दिंडी समाधीमंदिरात प्रदक्षिणा करते व त्यानंतर आरती | हैबतरावबाबातर्फे |
| दुपारी १२ ते १२.३० | संजीवन समाधी दिन स्मरण व घंटानाद | संस्थानतर्फे |
| दुपारी १२.३० ते१ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| सायं. ६.३०ते ८.३० | कीर्तन वीणामंडपात | सोपानकाका देहूकर |
| रात्रौ ८.३०ते ९.३० | धुपारती | संस्थानतर्फे |
| रात्रौ १२ते४ | जागर | हैबतरावबाबा तर्फे |
| | **कार्तिक वद्य चतुर्दशी** | |
| पहाटे ३ते ४.३० | जागरआरती, महापूजा व दुधारती | संस्थानतर्फे |
| पहाटे ४.३० ते ११:३० | भाविकांच्या महापूजा | |
| दुपारी १२.३०ते १ | महानैवेद्य | संस्थानतर्फे |
| रा.८.३०ते९.३० | धुपारती | संस्थानतर्फे |
| रात्रौ १ | श्रींची शेजारती | संस्थानतर्फे |

**कार्तिक वद्य ।। ३०।।**

| वेळ | कार्यक्रम | कोणातर्फे |
|---|---|---|
| पहाटे ३ ते ५ | आरती, महापूजा दुधारती. | -------- |
| पहाटे ५ ते सकाळी ११:३० | भाविकांच्या महापूजा | -------- |
| दुपारी १२:३० ते १ | महानैवेद्य | -------- |
| सायं. ४ ते ६ | कीर्तन | श्री. मोझे |
| रात्री ८ ते ८:३० | धुपारती | |
| रात्री ९:३० ते १२:३० | **श्रींचा छबीना- पालखीतून श्रींची नगरप्रदक्षिणा व मिरवणूक.**(मुखवटा) | |
| रात्री १२:३० | शेजारती. | -------- |

नंतर मानकरी यांना नारळ प्रसाद वाटप होते व संस्थानतर्फे सर्वांना चहा खिरापत दिली जाते.

**टीप :- कार्तिक यात्रे दरम्यान गुरुवार आल्यास नियमित कार्यक्रम होवून, श्री चोपदार यांचेतर्फे गुरुवारची पालखीची मंदिर प्रदक्षिणा व नंतर धुपारती होते. तसेच तिथीचा क्षय किंवा वाढीव तिथी आल्यास त्या दिवशीचे कार्यक्रम चोपदार यांचेशी विचारविनिमय करुन पार पाडले जातात.**

मार्गशीष शुद्ध ।।१।।

खंडोबा नवरात्र प्रारंभ. मंदिरात कोणताही कार्यक्रम नसतो.

मार्गशीष शुद्ध ।।६।। **''चंपाषष्टी''**

वांग्याचे भरीत व रोडग्याचा नैवेद्य व पुरणपोळीचा नैवेद्य.

मार्गशीष शुद्ध ।।७।।

कार्तिक यात्रेनिमित्त माऊलींची प्राक्षाळ पूजा गरमपाणी, लिंबू यांचे समाधीला अभ्यंगस्नान. दुपारी ११ ते १ पवमानपूजा व्यवस्थापकांच्या हस्ते गरमपाणी, लिंबू अभ्यंगस्नाने होते. पूरणाची आरती महानैवेद्य हया दिवशी सर्व मंदीराची स्वच्छता, सर्व मंदीर पाण्याने धुवून काढले जाते. रात्री १० ते १२ ग्रामस्थांचे भजन. त्यानंतर भक्तांसाठी काढा केला जातो. (साहित्य-गवती चहा, सुंठ, दालचिनी, काळेमिरी, लवंग, बेलाची पाने, तुळस, अडुळशाची पाने व गुळ) सर्वांना हा काढा प्रसाद म्हणून दिला जातो. व्यवस्थापकांच्या हस्ते श्रींना पूजा होते.

मार्गशीष शुद्ध ।।१२।।

धनुरमास प्रारंभ दररोज पहाटे ४ वाजता श्रींची पूजा झालेनंतर मुगाची खिचडी, उडदाचे पापड, मुगाचे लाडू, लोणचे, लिंबू, दही, ओले खोबरे व पावटयाची उसळ यांचा माऊलींना नैवेद्य दाखविला जातो.

मार्गशीष वद्य ।।१।। **''मकर संक्रांत''**

पहाटे श्रींना तिळाचे स्नान व तिळगुळाचा नैवेद्य. सर्व सेवकांना गुळपोळीचे भोजन. पहाटे ५ पासून पंचक्रोशीतील स्त्रिया मंदीरात वाण देणेस येतात. रात्री ७ वा. हा कार्यक्रम चालतो. सायं. सर्व पुरुषमंडळी श्रींना तिळगुळ द्यावयास येतात.

टीप :- दिनांक १४ किंवा १५ जानेवारीला मकर संक्रात येते, हा सन तारखेवर आधारीत असल्याने त्याचा तिथीशी संबंध येत नाही, सदर दिवशी पुढील कार्यक्रम होतात.

पौष शुद्ध ।।१४।।

नरसिंहसरस्वती स्वामींच्या रथाची पूजा व्यवस्थापकांच्या हस्ते होते.(रात्री १० वा.)

पौष वद्य ।।१।।

रात्री १० वाजता नरसिंहसरस्वती स्वामींची पालखी मंदीरात येते. व्यवस्थापकांच्या हस्ते पालखीची पूजा होते. नरसिंहसरस्वती महाराजांना पोषाख दिला जातो. गुडदाण्याचा प्रसाद दिला जातो.

पौष वद्य ।।२।। **''त्रिंबकेश्वर वारी''**

श्री ज्ञानेश्वर महाराजांचा वीणा निवृत्तीनाथांच्या भेटीसाठी त्रिंबकेश्वर नाशिककडे जाते. वीणा दिंडी पायी जाते. अंदाजे ६० ते ७० वारकरी पालखीबरोबर असतात. पूजेचा सर्व खर्च संस्थानतर्फे केला जातो. पौष वद्य ।।१३।। रोजी मा.प्रमुख विश्वस्त जाउन विधीवत पूजा करतात व नाथ महाराजांना कपडे देण्यात येतात. तसेच वणीच्या देवीला साडी चोळी दिली जाते.

माघ शुद्ध ।।५।। **''वसंत पंचमी ''**

श्री माऊलींना व विठ्ठलरूक्मिणी यांना पांढरा पोषाख केला जातो. श्री माऊली व विठ्ठलरूक्मिणी यांना केशरी रंग लावला जातो.

माघ शुद्ध ।।६।। **''रथसप्तमी-भोगी''**

श्रींना गुळपोळी, मिश्र भाजी व साजुक तुप यांचा नैवेद्य दाखविला जातो.

माघ शुद्ध ।।७।।

रथाची पूजा दुध उतू घालणे, गुळपोळीचा नैवेद्य श्रींना दाखविला जातो.

माघ शुद्ध ।।१।।

ह.भ.प.जोग महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त समाधीची पूजा केली जाते.

माघ शुद्ध ।।१४।। **''महाशिवरात्री''**

सिद्धेश्वरास व्यवस्थापकांच्या हस्ते रात्री ११ ते १२ वा.विधीवत पूजा रूद्राभिषेक होतो. सायं. ६:३० ते ८:३० कीर्तन वारकरी शिक्षण संस्था आळंदीतर्फे, रात्री ११ वाजता गावकरी भजन.

माघ शुद्ध ।।१५।।

श्री हैबतबाबा यांचेतर्फे पिंपळनेर माऊलींची दिंडी निळोबाराय जाते.

फाल्गुन शुद्ध पौर्णिमा- **''होळीपौर्णिमा''**

व्यवस्थापकांच्या हस्ते रा.७वा होळीची पूजा व नैवेद्य त्यानंतर ग्रामस्थांतर्फे नैवेद्य दाखविला जातो. यादिवशी धुपारती अगोदर होते, साधारणतः सायं. ७ ते ७:३० दरम्यान. ग्रामस्थांकडून गौ-या येतात त्यांची होळी होते.

फाल्गुन वद्य ।।२।। **''तुकारामबीज''**

तुकारामबीजे निमित्त भक्तांसाठी मंदीर २४ तास खुले राहते. मंदिरात येणारे वारकरी राहतात साधारण २ दिवस हा उत्सव चालू असतो, बरीच गर्दी असते.

फाल्गुन वद्य ।।५।। **''रंगपंचमी ''**

श्री माउलींना पांढरा पोषाख. कपडयावर केशरी रंग उडविला जातो. पहाटे खीर पुरीचा नैवेद्य दाखविला जातो.

फाल्गुन वद्य ।।६।। **एकनाथषष्ठी**
व्यवस्थापकांच्या हस्ते नंदीजवळील पादुकांना रूद्राभिषेक होतो. दुपारी १ वा. पुरण पोळीचा नैवेद्य.

**अशा प्रकारे दरवर्षी धार्मिक कार्यक्रम मंदीरात चालतात यात फक्त तारखेंचा बदल होतो. तसेच तिथीचा क्षय किंवा वाढीव तिथी असल्यास श्रींचे चोपदार व मालक यांचेशी सल्लामसलत करुन कार्यक्रमांचे आयोजन व आयोजन केले जाते.**

## श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची.

### श्री ज्ञानेश्वर महाराज मंदीरातील दैनंदिन कार्यक्रम.

| | | |
|---|---|---|
| १) | पहाटे ४ वाजता | घंटानाद. |
| २) | ४:०० ते ४:१५ | काकडा आरती. |
| ३) | ४:१५ ते ५:३० | पवमान पूजा, दुधारती |
| ४) | ६ ते ७ | महिम्न पूजा |
| ५) | पहाटे ५:३० ते १२:३० | दर्शनासाठी खुले. |
| ६) | स. ७ ते दु. १२:३० | भाविकांच्या श्रींना महापूजा |
| ७) | दु. १२:३० ते १ | महानैवेद्य(दर्शन बंद) |
| ८) | दु. १ ते ३ | दर्शन खुले |
| ९) | दु. ३ ते ३:३० | श्रींना पोषाख |
| १०) | दु. ३ ते रात्री ८ | दर्शन खुले |
| ११) | दु. ४ ते ५ | प्रवचन, वारकरी शिक्षण संस्थे तर्फे. |
| १२) | रात्री ८ ते ९ | धुपारती (सप्ताह असल्यास कीर्तन सेवा झालेनंतर) |
| १३) | ९ ते ९.३० | हरिपाठ |
| १४) | ११ ते ११:३० | शेजारती, मंदीर बंद. |

**वरील सर्व कार्यक्रमात सोईनुसार बदल करण्यात येतो.**

टिप :- रामनवमी, कृष्णाष्टमी, नरसिंह जयंती, महाशिवरात्र व सर्व एकादशी दिवशी महापूजा बंद असतात.